महाराष्ट्र शासन
सहसंचालक उच्चशिक्षण नागपूर विभाग, नागपूर. जुने मॉरीस कॉलेज ईमारत, सिताबर्डी, नागपूर
( दुरध्वनी क्रमांक 2554210 / फॅक्स क्र.0712–2561713)
Email:jdhengp@rediffmail.com

अतितात्काळ
कालमर्यादीत

क्र.उशिनाग / सह / अल्पसंख्याक शिष्य. / 4043 /
दिनांक 13.8.2012

प्रति

1. सहसंचालक तंत्रशिक्षण, सदर नागपूर.
2. सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण सिव्हील लाईन, नागपूर.
3. विभागीय उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर
4. सर्व शास. / अशासकीय महाविद्यालये नागपूर विभाग, नागपूर.

**विषय– शैक्षणिक वर्षे सन 2012–13 करीताच्या पोस्ट मॅट्रिक अल्पसंख्याक शिष्यवृत्तीकरीता आवश्यक असणारी महाविद्यालयाची माहीती सादर करणेबाबत.**

**संदर्भ– मा. शिक्षण संचालक, उच्चशिक्षण पुणे यांचे पत्र क्रं. उशिसं / 2012–13 / पीएमएस / 655 शिष्यवृत्ती दिनांक 8 ऑगष्ट 2012**

महोदय,

उपरोक्त विषयांचे संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्षे 2012–13 मध्ये पोस्ट मॅट्रिकोत्तर अल्पसंख्याक शिष्यवृती योजना अल्पसंख्याक कार्य मंत्रालय नवि दिल्ली यांचेकडुन एनआयसी मार्फत ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. त्याकरीता सर्व शास / अशा / कनिष्ठ / वरिष्ठ महाविद्यालये, आयटीआय, व्होकेशनल संस्था इत्यादी महाविद्यालयाची माहीती (डाटा) एनआयसीच्या सर्व्हरमध्ये भरण्याकरीता व महाविद्यालये संस्था यांना पासवर्ड व युजर आयडी देण्याकरीता महाविद्यालये / संस्था यांचा प्राचार्याचा ईमेल आयडी व मोबाईल नंबर आवश्यक आहे. करीता सदरची माहीती तात्काळ उलट टपाली या कार्यालयास पाठविण्याबाबतच्या आपल्या स्तरावरुन संबंधित महाविद्यालयांना सूचना निर्गमित कराव्यात. प्रस्तुत प्रकरणाची निकड लक्षात घेता सदरची माहीती या कार्यालयास पाठविण्याबाबतची कार्यवाही तात्काळ कराल ही विनंती.

सहसंचालक उच्चशिक्षण,
नागपूर विभाग, नागपूर

प्रतिलिपी–

जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
नागपूर / वर्धा / चंद्रपुर / गडचिरोली / भंडारा / गोंदिया,

आपणास कळविण्यांत येते की, आपणामार्फत भारत सरकार शिष्यवृती ऑनलाईन राबविण्यात येते त्यामुळे कनिष्ठ / वरिष्ठ महाविद्यालये, आयटीआय, व्होकेशनल इत्यादी महाविद्यालयाचे नांव, प्राचार्याचे ईमेल आयडी, व मोबाईल नंबरची यादी या कार्यालयास उलट टपाली पाठवावी ही विनंती.

---

अतितात्काळ
कालमर्यादीत

सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर
क्र. तंशिस / प्राकाना / शैवि / पदविका / २०१२ / 2474
दि. 16 AUG 2012

प्रति,

प्राचार्य,
सर्व पदवीका संस्था, नागपूर विभाग
(अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र / एच.एम.सी.टी पदवीका संस्था)

यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रात नुमद केल्यानुसार माहिती उलटटपाली सहसंचालक, उच्च शिक्षण, वि.का., नागपूर येथे तात्काळ सादर करावी.

सहसंचालक,
तंत्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय, नागपूर